# कौटुंबिक पातळीवरील जबाबदारी

- सामुहिकपणे आपत्तीशी सामना करावा लागतो. तरीही एक स्वतंत्र व्यक्ती आणि कुटुंब म्हणूनही काही जबाबदारी स्वीकारुन, ती पार पाडावी लागते.
- गावातील कृती गटाने गावकऱ्यांच्या वारंवार बैठका घेऊन, आपत्तीशी सामना करण्यासाठी लोकांना विश्वासात घ्यावे.
- कृती गट कोणकोणती कामे करणार आहे आणि व्यक्ती/कुटुंब म्हणून त्यांनी कोणती कामे करणे अपेक्षित आहे, याची जाणीव करुन देणे.
- कौटुंबिक पातळीवरील गावकऱ्यांची जबाबदारी

## आपत्ती पूर्व - कुटुंबपातळीवर करायची कामे -

- आपले कुटुंब जेथे राहते त्या घराचे / इमारतीचे मजबुतीकरण करुन घेणे.
- आपत्तीमुळे आपल्या अर्थाजनावर विपरित परिणाम होऊ नये म्हणून पर्यायी व्यवस्था करुन ठेवणे.
- घरातील महत्वाच्या वस्तू ज्याच्याकडे सुरक्षित ठिकाण आहे त्यांच्याकडे ठेवणे.
- कुटुंबातील सर्व सदस्यांना सुरक्षित सुटका मार्गाची माहिती देऊन, संकटसमयी सगळ्यांनी स्वतःच्या सुरक्षेची काळजी घेण्याविषयी मार्गदर्शन करणे. बॅटरी व बॅटरीवर चालणारा ट्रान्झीस्टर कायम घरात ठेवणे. प्रथमोपचार पेटी सुरक्षित ठिकाणी ठेवणे.
- पुरेसे धान्य ठेऊन, इतर साठा विकता येत असेल तर विकून टाकणे.
- घराची वारंवार दुरुस्ती करुन, घर सुरक्षित राहील याची काळजी घेणे.

## आपत्तीकाळातील कामे -

- सुरक्षित सुटका मार्गास तपास घेऊन सुरक्षित स्थळी पोहचणे.
- जडवस्तू पडून आपण अडकून पडणार नाही याची काळजी घेणे.
- बियाणे, खते, औजारे, सुकेअन्न सुरक्षित ठेवणे.
- मालमत्तेसंबंधीची कागदपत्रे सुरक्षित ठेवणे.
- रेडिओ, टी.व्ही. वरुन येणारे संदेश ऐकणे.
- कुटूंबातील सदस्यांना तीन दिवस पुरेल इतके अन्न, पाणी, इंधन सुरक्षित ठेवणे.
- पुरेसे औषध सोबत ठेवणे.
- एकत्रित जेवणावळीत सामील होणे.
- अफवांवर विश्वास न ठेवणे.
- आर.सी.सी. घर असल्यास वरच्या मजल्यावरुन तळमजल्यावर येणे.

## आपत्तीनंतरची कामे :

- कृती गटाच्या आदेशाचे पालन करणे.
- अन्न पुरवठा, परिसर स्वच्छतेसाठी स्वयंसेवक म्हणून काम करणे.
- स्वतः आणि कुटुंबिय वापरत असलेल्या शौचकुपाची सफाई अभावी दुर्गंधी व घाण वाढणार नाही याची दक्षता घेणे.
- आपल्या गरजा आणि समस्या निवारा व्यवस्थापनास सांगणे.
- गहाळ व्यक्तीबाबतची माहिती व त्याचे ठिकाण याबाबतची माहिती बचाव गटास देणे.
- त्यांच्या बचावकामासाठी संबंधित गटास पाठवणे.
- पडलेले ढीग उपसणे.
- शक्य तितक्या लवकर घराची दुरुस्ती / बांधणी सुरु करणे.

## आपत्ती जोखीम व्यवस्थापन कार्यक्रम

निवासी उपजिल्हाधिकारी, जळगाव तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगाव

जिल्हाधिकारी जळगाव तथा
अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन
प्राधिकरण, जळगाव

जिल्हाधिकारी कार्यालय जळगाव नियंत्रण कक्ष, फोन : (०२५७) २२१७१९३ वा २२२०८०० टोल फ्रि नं. १०७७

द्वारा जनहितार्थ प्रकाशित